


antarang
aspire · act · achieve

# आम्ही कोण आहोत

"मोठे झाल्यावर तुम्हाला काय बनायचे आहे?"
 काही लोकांसाठी हा प्रश्न सोपा असतो, पण भारतातील अनेक विद्यार्थ्यांसाठी हा प्रश्न कठीण असतो. काही लोकांसाठी हा प्रश्न उत्साहाने भरलेला असतो- असंख्य शक्यतांनी परिपूर्ण. पण भारतातील लाखो तरुणांसाठी या प्रश्नाचे उत्तर खूप दूरचे वाटते—अनिश्चितता, मर्यादित अनुभव आणि त्यांच्या नियंत्रणाबाहेरील परिस्थितींमुळे धूसर झालेले.

अनेक विद्यार्थी शाळा सोडतात कारण त्यांना शिक्षणाचा भविष्यासोबत संबंध कळत नाही। काही जण कुटुंबाच्या अपेक्षेमुळे करिअर निवडतात। अनेक जण भविष्याशी शिक्षणाचा जुडलेला संबंध समजू शकत नाहीत आणि म्हणून ते शिक्षण सोडतात , व काही जण कुटुंबाचा अपेक्षांवर आधारित आपले करियर निवडतात आणि आपली खरी आवड व क्षमता ह्यांचा विचार करत नाहीत.
।अंतरंगमध्ये आम्ही मानतो की करिअर शिक्षण ही विशेष सुविधा नाही तर तो प्रत्येकाचा हक्क आहे. आमचे ध्येय म्हणजे ते सार्वजनिक शालेय व्यवस्थेत समाविष्ट करणे, जेणेकरून प्रत्येक तरुणाला त्यांच्या पार्श्वभूमीची पर्वा न करता स्वप्न पाहण्यासाठी, कृती करण्यासाठी आणि यश मिळवण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन, कौशल्ये आणि आत्मविश्वास मिळेल.

आणि हे कार्य यशस्वी ठरत आहे. आमचे विद्यार्थी आज चित्रपट निर्माते, फिटनेस प्रशिक्षक, शेफ, उद्योजक आणि बरेच काही बनत आहेत. गरिबीच्या चक्राला तोडत आणि आपले भविष्य नव्याने घडवत आहेत. मागील दशकात, आम्ही ३,६०,००० पेक्षा अधिक किशोरवयीन विद्यार्थ्यांना विविध करिअर मार्गांमध्ये मार्गदर्शन केले आहे.

# आमचे धाडसी ध्येय ?

2030 पर्यंत 1 कोटी विद्यार्थ्यांना (इयत्ता 9 ते 12) त्यांच्या आवडीच्या करिअरपर्यंत पोहोचवणे। 2030 पर्यंत ९वी ते १२वीच्या १ कोटी (१० दशलक्ष) तरुणांना त्यांच्या आवडीच्या करिअर मार्गांमध्ये प्रवेश मिळवून देणे. म्हणूनच आम्ही शाळा, पालक, उद्योग आणि सरकार यांच्यासोबत भागीदारी करतो आणि करिअर मार्गदर्शन शिक्षण व्यवस्थेत समाविष्ट करून, प्रत्येक तरुणाला प्रगती करण्यासाठी आवश्यक असलेला आधार आणि संधी उपलब्ध करून देतो.

आता, आम्ही अशा लोकांच्या शोधात आहोत ज्यांना शक्यतांच्या शक्तीवर विश्वास आहे.

अंतरंगमध्ये तुमचे काम केवळ नोकरीच नव्हे तर ते तरुणांच्या आयुष्याची दिशा बदलण्याची संधी असेल.

जर हे तुम्हाला प्रेरणादायी वाटत असेल, तर या प्रवासात तुमचे स्वागत आहे.

# आमचा कार्यक्रम

आमचा कार्यक्रम हा ९वी ते १२वीच्या विद्यार्थ्यांसाठी ४ वर्षांचा करिअर मार्गदर्शन उपक्रम आहे. समन्वयक (Facilitators) वर्गात सत्रे घेतात आणि विद्यार्थ्यांच्या आवडी व क्षमतांनुसार योग्य करिअर पर्याय शोधण्यासाठी सायकोमेट्रिक चाचण्या घेतात.

विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन अहवाल (guidance report) तयार केला जातो. त्यानंतर वैयक्तिक समुपदेशन (individual counselling) केले जाते. या कार्यक्रमामध्ये ध्येय निश्चिती (Goal Setting), अभ्यास कौशल्ये (Study Skills) आणि प्राधान्यक्रम ठरवणे (Prioritizing) यांचाही समावेश आहे, ज्यामुळे विद्यार्थी त्यांच्या शैक्षणिक आणि करिअरच्या उद्दिष्टांवर लक्ष केंद्रित ठेवू शकतात.

आम्ही आमची सत्रे ४ भाषांमध्ये घेतो – इंग्रजी, हिंदी, मराठी आणि उर्दू. हा कार्यक्रम विद्यार्थ्यांना सहभागी करून घेण्यासाठी, रूढीवादी विचार मोडण्यासाठी आणि पालक व मुख्याध्यापकांच्या सहभागातून विद्यार्थ्यांच्या आकांक्षा विकसित करण्यासाठी तयार करण्यात आला आहे.

# भूमिका: प्रोग्राम सपोर्ट ऑफिसर

**ठिकाणे: मुंबई, ठाणे, पुणे, धाराशिव, यमुनानगर**

**पार्ट-टाइम**

**तुमच्या स्वतःच्या कारकिर्दीला आकार देतानाच हजारो तरुणांच्या भविष्याला दिशा देणाऱ्या संघात सामील व्हा!!**

## मुख्य जबाबदाऱ्या

### करिअर सेशन्स घेणे गुणवत्तापूर्ण करिअर सत्रे देणे

- सर्व नेमून दिलेल्या शाळा आणि वर्गांमध्ये नियोजित करिअर शिक्षण सत्रांची अंमलबजावणी करणे आणि सत्रांची वारंवारता व गुणवत्ता मानके कायम राखणे
- विद्यार्थ्यांचा जास्तीत जास्त सहभाग सुनिश्चित करण्यासाठी सुरक्षित आणि समावेशक वर्ग वातावरण तयार करणे
- अभ्यासक्रमाच्या चौकटीशी सुसंगत राहून स्थानिक परिस्थितीनुसार सत्रांचे सादरीकरण अनुकूल करणे
- विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा अभ्यास करण्यासाठी मूल्यांकन आणि एक्झिट स्लिप्समधील डेटा विश्लेषित करणे आणि त्यानुसार आवश्यक सहाय्य समायोजित करणे.

### डेटा व्यवस्थापन

- बेसलाइन, एंडलाइन आणि मॉड्यूल-आधारित (BL/EL) मूल्यांकनांचे संचालन करणे
- OMR प्रक्रियेची अचूकता राखणे, सर्व विद्यार्थ डेटा योग्य प्रकारे संकलित करणे, नोंदवणे आणि वेळेत सादर करणे
- सत्रांचे वेळापत्रक, उपस्थिती आणि इतर माहिती नियमित अंतराने अपलोड करणे
- वेळापत्रकाच्या नोंदी ठेवणे, पायलट सत्रे घेणे, पायलट डेटा जतन करणे आणि जिल्हा/राज्य स्तरावरील सर्व अहवालांची पूर्तता करणे
- अंमलबजावणीतील अडचणी ओळखून त्या राज्य/जिल्हा टीमपर्यंत पोहोचवणे आणि उपाय सुचवणे.

### समुपदेशन आणि वैयक्तिक विद्यार्थी सहाय्य

- बसर्व विद्यार्थ्यांसाठी वैयक्तिक करिअर समुपदेशन सत्रे घेणे
- संक्रमणाच्या टप्प्यांवर, शाळा सोडण्याच्या जोखमीतील विद्यार्थ्यांना आणि विशेष मार्गदर्शनाची गरज असलेल्या विद्यार्थ्यांना अतिरिक्त सहाय्य देणे
- आवश्यकतेनुसार संरचित गटचर्चा (reflection) आणि सहअध्ययन (peer-learning) उपक्रम सुलभ करणे
- विद्यार्थ्यांना संबंधित संसाधने, प्लॅटफॉर्म (NCS, Shiksha) आणि उद्योग क्षेत्रातील नेटवर्क्सशी जोडणे.

### पालक आणि समुदाय सहभाग

- पालकांसाठी माहितीपर आणि ओरीएंटेशन सत्रांचे आयोजन करणे
- उच्च जोखमीतील किंवा विशेष गरज असलेल्या विद्यार्थ्यांसाठी (शाळेच्या शिक्षकांसह) टेलीफोनद्वारे फॉलो-अप आणि घरभेटी घेणे
- समुदायाच्या परिस्थिती आणि लिंगाधारित अपेक्षा यांचा सहानुभूतीने व सांस्कृतिक संवेदनशीलतेने विचार करून कार्य करणे.

### शालेय परिसंस्थेमध्ये गुंतवणूक

- मुख्याध्यापक/मुख्याध्यापिकांसोबत नियमित बैठक घेणे, संरचित अहवाल (structured report) सादर करणे आणि शाळेच्या संस्कृतीत करिअर शिक्षण समाविष्ट करण्यासाठी प्रयत्न करणे.
- शिक्षक आणि शाळेतील कर्मचाऱ्यांसोबत सशक्त संबंध निर्माण करून सहकार्यपूर्ण शिकण्याचे वातावरण तयार करणे.

### इंडस्ट्री एक्सपोजर उद्योग परिचय आणि माजी विद्यार्थी सहभाग

- उद्योग भेटी, करिअर मेळावे आणि वक्ता सत्रांचे समन्वय करणे
- संबंधित क्षेत्रातील माजी विद्यार्थी आणि कार्यरत व्यावसायिकांशी विद्यार्थ्यांचा संवाद साधण्यासाठी सत्रांचे आयोजन करणे
- विद्यार्थी आणि उद्योग भागीदारांकडून अभिप्राय, अनुभवकथन (testimonials) आणि प्रभावकथा (impact stories) संकलित करणे.
- माजी विद्यार्थ्यांना ट्रांझिशन कॉल्स, इव्हेंट्स आणि सततच्या संवादाद्वारे सहाय्य करा, तसेच कार्यक्रमाच्या उपक्रमांमध्ये त्यांचा सहभाग वाढवण्याच्या संधी ओळखा

### व्यावसायिक शिक्षण आणि विकास

- सर्व प्रशिक्षण सत्रांमध्ये सहभागी होणे (ऑनबोर्डिंग, रिफ्रेशर प्रशिक्षण आणि मासिक कार्यशाळा यांसह)
- सातत्यपूर्ण शिक्षण, प्रमाणपत्रे आणि व्यावसायिक विकासासाठी LMS सोबत सक्रिय सहभाग ठेवणे
- सहअध्ययन (peer-learning) गटांमध्ये सहभागी होणे आणि विशेषतः शाळा नसलेल्या आठवड्यांमध्ये संशोधनाद्वारे टीमच्या ज्ञाननिर्मितीत योगदान देणे
- सत्रांची अंमलबजावणी आणि विद्यार्थ्यांच्या शिकण्यावर TnQ टीम सदस्यांसोबत चिंतन (reflection) करणे
- संबंधित विषयांवरील ज्ञान वाढवण्यासाठी स्वयं-अभ्यास (self-guided research) करणे आणि लर्निंग पॅकेट्सचा वापर करणे

- PSO ची अतिरिक्त भूमिका- करिअर शिक्षकांसाठी नियमित वर्ग निरीक्षणे (classroom observations) करणे
- विद्यार्थ्यांवर सकारात्मक परिणाम साधण्यासाठी करिअर शिक्षकांना अभिप्राय देणे आणि मार्गदर्शन (coaching) करणे.

## पात्रता अटी

- कोणत्याही शाखेतील पदवी
- B.Ed. / काउन्सलिंग (असल्यास चांगले)
- सोमवार ते शनिवार, किमान एक वर्षासाठी दररोज ५ तास देण्यास सक्षम असावे.
- स्थानिक भाषेचे ज्ञान आवश्यक
- 1–2 वर्षांचा अनुभव
- बेसिक संगणक ज्ञान
- कोणत्याही शाखेतील पदवीधर; सामाजिक शास्त्र (Social Sciences) किंवा शिक्षण क्षेत्रातील पार्श्वभूमी असलेल्यांना प्राधान्य
- B.Ed. किंवा समुपदेशनातील प्रमाणपत्र असल्यास अधिक फायदेशीर
- स्थानिक भाषेचे प्रभुत्व आवश्यक; इंग्रजीचे कार्यात्मक ज्ञान आवश्यक
- वर्ग व्यवस्थापन, विद्यार्थी सुलभीकरण (facilitation) किंवा संबंधित शैक्षणिक क्षेत्रात १–२ वर्षांचा अनुभव
- किशोरवयीन विद्यार्थी आणि पहिल्या पिढीतील शिकणाऱ्यांसोबत कामाचा अनुभव असल्यास अधिक प्राधान्य
- समुदाय-आधारित किंवा तळागाळातील कार्यक्रमांमध्ये कामाचा अनुभव असल्यास उत्तम
- मूलभूत डिजिटल कौशल्ये — Google Suite (Docs, Sheets, Forms) आणि WhatsApp
- कार्यक्रमाशी संबंधित दस्तऐवजीकरण आणि इतर कामे व्यवस्थित ठेवण्याची क्षमता
- विविध सामाजिक पार्श्वभूमीतील किशोरवयीन विद्यार्थ्यांसोबत काम करताना सहानुभूती आणि संवेदनशीलता
- स्थानिक संदर्भाची जाण आणि समुदायाशी मजबूत नातेसंबंध
- समस्यांचे निराकरण करण्याची वृत्ती, जबाबदारीची जाणीव आणि स्वयंप्रेरित दृष्टिकोन
- विद्यार्थी, कुटुंबे आणि टीम सदस्यांशी विश्वासावर आधारित नातेसंबंध निर्माण करण्याची क्षमता
- सातत्याने शिकण्याची आणि वैयक्तिक प्रगतीची बांधिलकी
- चांगले संबंध निर्माण करणारे.

## तुमच्यासाठी काय आहे

- देशाच्या भविष्यात योगदान देण्याची संधी
- सकारात्मक आणि सहयोगी वातावरण
- नवीन कौशल्ये शिकण्याची संधी
- मजबूत नातेसंबंध तयार करण्याची संधी
- देशाच्या भविष्यात थेट योगदान देत, एका मोठ्या आव्हानात्मक क्षेत्रावर सकारात्मक प्रभाव टाकण्याची संधी
- उत्साही, आनंदी आणि काळजीपूर्ण (care-centered) कार्यसंस्कृतीचा भाग होण्याची संधी
- संरचित प्रशिक्षण, सातत्यपूर्ण सराव आणि अभिप्रायाद्वारे स्वतःची कौशल्ये विकसित करण्याची संधी
- सामाजिक क्षेत्रात आणि त्यापलीकडे विविध भूमिका पार पाडण्याची तयारी करून स्वतःला अधिक करिअर-तयार बनवण्याची संधी
- आणि शेवटी पण महत्त्वाचे... मजबूत नाती आणि कनेक्शन्स निर्माण करण्याची संधी!

## मानधन

- साधारण ₹१६,००० – ₹२०,००० प्रति महिना (अनुभवानुसार)।

**अर्ज कसा करावा?**

कृपया अर्ज भरा.

येथे अर्ज करा

आपल्याला शुभेच्छा! पुन्हा संपर्कात राहण्याची आशा आहे.



**भारतातील तरुणांना त्यांच्या भविष्याची जबाबदारी घेण्यासाठी सक्षम करणे**